असा. क्र. १४५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००२

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर ३०, २००२/पौष ९, शके १९२४

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३० डिसेंबर २००२

**अधिसूचना**

**नोंदणी अधिनियम, १९०८.**

क्र. नोंदणी. २०००/४४९४/सीआर-१०८२/म-१.—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र शासनाला लागू करताना, त्याच्या कलम ७८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, शासकीय अधिसूचना, महसूल विभाग क्र. आरजीएन. १५५८/६७७३१/एन, दिनांक १७ जुलै १९६१ यांखाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या फी तक्त्यामध्ये सुधारणा करीत आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ती सुधारणा, याद्वारे पुढीलप्रमाणे दिनांक १ जानेवारी २००३ पासून प्रसिद्ध करण्यात येत आहे, ती अशी :—

१. उक्त अधिसूचनेतील, फी तक्त्यामधील (यात यापुढे ज्याचा "उक्त तक्ता" असा निर्देश करण्यात आला आहे).—

(क) अनुच्छेद १ च्या खंड (४) मधील.—

(एक) उप खंड (ग) ऐवजी पुढील उप खंड दाखल करण्यात येत आहे, तो असा :—

(ग) अशी रक्कम किंवा मूल्य याचा स्पष्टपणे निर्देश करण्यात आला नसेल तर, नियत फी पुढीलप्रमाणे :—

| | रुपये |
|---|---|
| (१) बृहन्मुंबई, बृहन्मुंबईला लागून असणाऱ्या ठाणे तालुक्यातील ठाणे-वसई खाडीने वेढलेल्या भागासह व नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र व थंड हवेची ठिकाणे, पुणे व खडकी कॅन्टॉन्मेंट (कटक मंडळे) यांसह पुणे महानगरपालिका येथे स्थित असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत. | १,००० |
| (२) वरील खंड (१) मध्ये नमूद केलेल्या महानगरपालिकाव्यतिरिक्त अन्य महानगरपालिका आणि देवळाली, देहू रोड व औरंगाबाद ही कॅन्टॉन्मेंट क्षेत्रे (कटक मंडळे). | ७५० |
| (३) वरील खंड (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या ठिकाणांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही ठिकाणी स्थित स्थावर मालमत्तेच्या बाबतीत. | ५०० |
| (४) भागीदारी विलेखाच्या बाबतीत. | १,००० |
| (५) जंगम मालमत्तेच्या बाबतीत. | ५०० |

(दोन) टीप-१ मध्ये, "रुपये २०" या मजकुराऐवजी "रुपये १००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(तीन) टीप-२ मध्ये, "रुपये २०" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "रुपये १००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(चार) टीप-४ मध्ये, खंड (१), (२) व (३) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

| | फी निर्धारित केली जाईल |
|---|---|
| "१. भाडे निश्चित करण्यात आले असेल आणि कोणताही दंड किंवा अधिमूल्य यांचा भरणा करण्यात आला नसेल किंवा पैसे आगाऊ घेण्यात आले नसतील तर, त्याबाबतीत भाडे पट्ट्याला मंजुरी देण्यात आल्यास— | |
| (क) जेव्हा भाडे पट्टा तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत, | भाड्याची संपूर्ण रक्कम किंवा सरासरी वार्षिक भाड्याची रक्कम यापैकी जी कमी असेल अशा रकमेपैकी. |

| | |
|---|---|
| (ख) जेव्हा भाडेपट्टा तीन वर्षांपेक्षा अधिक मात्र दहा वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबातीत, | सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेच्या तिप्पट रक्कम. |
| (ग) जेव्हा भाडेपट्टा दहा वर्षांपेक्षा अधिक मात्र घटनेपेक्षा किंवा अन्य प्रकारच्या नवीकरण खंडाशिवाय एकोणतीस वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत, | सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेच्या पाच पट रक्कम. |
| (घ) जेव्हा भाडेपट्टा एकोणतीस वर्षांपेक्षा अधिक किंवा शाश्वत कालावधीकरिता असल्याचे अभिप्रेत असेल किंवा अनिश्चित कालावधीसाठी किंवा घटनेपेक्षा किंवा अन्य प्रकारच्या नवीकरण खंडासह दहा वर्षांच्या कालावधीच्या भाडेपट्ट्यासाठी असल्याचे अभिप्रेत नसेल अशा बाबतीत, | सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेच्या दहा पट रक्कम. |
| २. जेव्हा भाडेपट्टा दंड किंवा अधिमूल्य किंवा आगाऊ दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशांसाठी मंजूर करण्यात आला असेल आणि कोणतेही भाडे निश्चित करण्यात आले नसेल त्याबाबतीत, | दंड किंवा अधिमूल्य किंवा आगाऊ दिलेली किंवा आगाऊ द्यावयाची अशी रक्कम. |
| ३. दंड किंवा अधिमूल्य किंवा आगाऊ दिलेल्या किंवा निश्चित केलेल्या भाड्याव्यतिरिक्त आगाऊ द्यावयाच्या पैशांसाठी भाडेपट्टा मंजूर करण्यात आला असेल त्याबाबतीत, | दंड किंवा अधिमूल्याची रक्कम किंवा आगाऊ रक्कम दिलेली नसेल तर अशा भाडेपट्ट्यावरील जो कोणताही दंड किंवा अधिमूल्य किंवा अग्रिमाची रक्कम किंवा फी व्यतिरिक्त द्यावयाची आगाऊ रक्कम देय असेल ती."; |

(पाच) **स्पष्टीकरण.**—एक ऐवजी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येत आहे, ते असे :—

"**स्पष्टीकरण-एक.**—भाड्याच्या रकमेचा आगाऊ केलेला भरणा हा, जरी भाड्याचा कोणताही हप्ता किंवा हप्ते म्हणून वजावट करण्यासाठीची तरतूद असली तरीही या अनुच्छेदांच्या अर्थांतर्गत तो, अधिमूल्य किंवा आगाऊ भरलेले पैसे असल्याचे मानले जाईल.";

(सहा) टीप ४ क ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

"**टीप ४ क.**—प्रतिफलाशिवाय कुळवहिवाट अधिकाराच्या हस्तांतरणासाठी, पुढीलप्रमाणे फी असेल,—

| | रुपये |
|---|---|
| (१) अनुच्छेद १ च्या खंड (४) च्या उप-खंड (ग) च्या बाब (एक) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्तेसाठी. | ५०० |
| (२) अनुच्छेद १ च्या खंड (४) च्या उप-खंड (ग) च्या बाब (दोन) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्तेसाठी. | ३०० |
| (३) अनुच्छेद १ च्या खंड (४) च्या उप-खंड (ग) च्या बाब (तीन) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्तेसाठी. | २०० |
| (४) अनुच्छेद १ च्या खंड (४) च्या उप-खंड (ग) च्या बाब (चार) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्तेसाठी. | १००.". |

(सात) टीप ७ ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

"**टीप ७.**—कोणत्याही प्रकरणात भाडे, पारिश्रमिक किंवा मजुरी हे अंशतः पैशाच्या स्वरूपात किंवा अंशतः वस्तूच्या स्वरूपात आणि अंशतः वस्तूच्या व पैशाच्या स्वरूपात देय असेल आणि वस्तूच्या स्वरूपात देय असलेल्या भागाचे मूल्य व्यक्त केलेले नसेल तर फी ही पैशाच्या स्वरूपात देय असलेल्या रकमेवर आकारणी योग्य मूल्यानुसार फीच्या दुपटी इतकी आकारण्यात येईल.

**उदा.**—जर पैशाच्या स्वरूपात देय असलेल्या रकमेवर वसुलीयोग्य मूल्यानुसार फी रुपये १०० आहे तर दस्तऐवजाच्या बाबतीत वसुलीयोग्य एकूण फी ही पैशांच्या स्वरूपातील मूल्यावर रुपये १०० अधिक वस्तूच्या स्वरूपातील प्रदानासाठी रुपये १०० इतकी असेल. तर भाडे किंवा पारिश्रमिक पूर्णपणे वस्तूच्या स्वरूपात देय असेल आणि जर द्रव्यमूल्य व्यक्त केले नसेल तर अनुच्छेद १ (४) (क) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नियत फी वसूल करण्यात येईल.";

(आठ) टीप ९ ऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

"**टीप ९.**—प्रतिफलाविरहित पुष्टीकरण विलेखाच्याबाबतीत, अनुच्छेद एक अन्वये मूल्यानुसार फी वसूल केलेली असेल तेव्हा सदर विलेखासाठी रुपये १०० इतकी फी पुष्टीकरण केलेल्या दस्तऐवजावर आकारण्यात येईल असे पुष्टीकरण प्रतिफलासाठी, असेल अशाबाबतीत पुष्टीकरण केलेल्या विलेखावर वसुलीयोग्य असलेल्या फी व्यतिरिक्त अनुच्छेद १ खालील मूल्यानुसार फी आकारण्यात येईल.";

(नऊ) टीप ११ ऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

"**टीप ११.**—स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठीचा करार घडवून आणणे अभिप्रेत असलेले किंवा घडवून आणणारे दस्तऐवज असल्यास दस्तऐवजावर, मूल्यानुसार फी आकारण्यात येईल. अशा मालमत्तेच्या विक्रीद्वारे आणि उक्त करारानुसार करून दिलेला हस्तांतरण करण्यासाठीचा अभिप्रेत किंवा उपयोगात येणारा दस्तऐवज पूरक दस्तऐवज असल्याचे समजले जाईल आणि त्यानुसार, कमाल रुपये १०० यास अधीन राहून, फी आकारण्यात येईल."

(ख) उक्त तक्त्यामधील, अनुच्छेद दोनमध्ये "रुपये २०" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "रुपये १००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(ग) उक्त तक्त्यामध्ये,—

(१) अनुच्छेद तीन ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे, तो असा :—

"तीन. हा अनुच्छेद, ज्या दस्तऐवजांवरील फी, अनुच्छेद एक मधील मूल्यानुसार प्रमाणानुसार परिगणित केलेल्या विवक्षित कमाल नोंदणी फीच्या अधीन असते अशा दस्तऐवजांना लागू होतो. पुढील दस्तऐवजांवर जास्तीतजास्त रुपये १०० इतकी फी आकारण्यात येईल ते दस्तऐवज असे :—

(एक) जेथे पूर्वीच्या दस्तऐवजांच्या बाबतीत अनुच्छेद १ अनुसार पूर्ण मूल्यानुसार फी आकारण्यात आली आहे, अशा पूर्वीच्या नोंदणीकृत दस्तऐवजांमध्ये व्यक्त केलेल्या मात्र अशा दस्तऐवजांच्या निष्पादनाच्या वेळी प्रदान न केलेल्या मोबदल्याची जे पोचपावती देतात अशा अन्य एखाद्या नोंदणीकृत दस्तऐवजांच्या मोबदल्याच्या प्रदानाची केवळ पोचपावती देतात असे दस्तऐवज.

(दोन) यापूर्वी नोंदणी केलेल्या गहाणाच्या धारणाधिकाराच्या प्रतिपूर्तीकरिता निष्पादित केलेले, आणि ज्यावर पूर्ण मूल्यानुसार फी आकारण्यात आली आहे असे प्रत्यंतरणपत्र व परिमोचनपत्र.

(तीन) नोंदणी करण्यात आलेली आहे आणि ज्यावर मूल्यानुसार फी बसवण्यात आली आहे अशा गहाणांसाठीचा हप्ता मिळाल्याची पोच देणारे दस्तऐवज.

(चार) न्यासाचे प्रत्याहरण किंवा समझोता.(याखालील टिप-१ पहा.)

(पाच) एकाच दिवशी, मूळ दस्तऐवजासह किंवा दस्तऐवजांसह नोंदणीसाठी सादर केलेली दुसरी प्रत किंवा दुसऱ्या प्रती.

(सहा) एकाच दिवशी, मूळ दस्तऐवजासह किंवा दस्तऐवजांसह नोंदणीसाठी सादर न केलेल्या, मात्र मूळ दस्तऐवजाच्या किंवा दस्तऐवजांच्या नोंदणी संदर्भ उद्धृत केलेल्या दुसऱ्या प्रती.

(सात) ज्यावर अनुच्छेद एकमध्ये असल्याप्रमाणे पूर्ण मूल्यानुसार फी भरण्यात आली आहे अशा इतर दस्तऐवजानुसार अंमलात आणलेले हक्कसोड. (याखालील टीप-२ पहा)."

(२) टीप ४ मध्ये "रुपये २०" हा मजकूर ज्यां दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी "रुपये १००" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

(घ) उक्त तक्त्यामध्ये,——

(क) अनुच्छेद चार खालील टीप १ व २ वगळून, अनुच्छेद चार ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :——

"चार. ज्या दस्तऐवजांवर निश्चित फी आकारावयाची आहे अशा दस्तऐवजांना हा अनुच्छेद लागू होईल. पुढील दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी रुपये १०० इतकी निश्चित नोंदणी फी आकारली जाईल,——

(एक) प्रतिफलाविना कुळवहिवाट अधिकाराच्या हस्तांतरणाची मागणी करणारे दस्तऐवज;

(दोन) उपरोक्त अनुच्छेद एकच्या खंड (३ क) मध्ये वर्णन केलेल्या स्वरूपाचा नसेल असा मुखत्यारनामा;

(तीन) घटस्फोटाचा लेखी दस्तऐवज, वारसा, पालकत्व, प्रशासकत्व, मृत्युपत्र, व्यवस्थापकत्व याबाबतचे प्रमाणपत्र;

(चार) मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ याच्या कलम ५२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या प्रलंबनाबाबतची नोटीस;

(पाच) न्यास रद्द करणे किंवा समझोता; (याखालील टीप २ पहा)

(सहा) भागीदारीचे विसर्जन;

(सात) मालमत्तेचे वाटणीपत्र किंवा मालमत्तेच्या भाडेपट्टाचे संविभाजन , दत्तविधानाविलेख यातील अग्रक्रमाधिकाराबाबतचा करार,

(आठ) प्रतिफलाची रक्कम किंवा मूल्य दर्शविण्यात आले नसताना मानचिन्हाची घोषणा, अधिकंथन, सुविधाधिकाराचा करार;

(नऊ) उक्त तक्त्यामधील अन्य कोणत्याही अनुच्छेदामध्ये समाविष्ट नसलेले दस्तऐवज."

(ख) टीप-१ मध्ये "रुपये २०" या मजकुराऐवजी "रुपये १००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(ङ) उक्त तक्त्यामधील अनुच्छेद पाच ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे तो असा :—

"पाच. उघडपणे सादर करण्यात आलेल्या मृत्युपत्राची किंवा दत्तक अनुज्ञापत्राची नोंदणी करणे किंवा मृत्युपत्र रद्द करणे. रुपये १००"

(च) उक्त तक्त्यामधील अनुच्छेद सहामधील "२०" या मजकुराऐवजी "१००" हा मजकूर ाखल करण्यात येत आहे.

(छ) उक्त तक्त्यामधील, अनुच्छेद सातमधील "२०" या मजकुराऐवजी "१००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(ज) उक्त तक्त्यामधील, अनुच्छेद आठमधील "२०" या मजकुराऐवजी "१००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(झ) उक्त तक्त्यामध्ये,—

(क) अनुच्छेद दहामधील, खंड (क) व (ख) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येत आहे, तो असा :—

**"दहा. तपासण्या व निरीक्षणे—**

| | रुपये |
|---|---|
| (१) मालमत्तेशी (कोणत्याही एका दस्तऐवजाअन्वये कार्यवाही करण्यात येत असलेल्या) कोणत्याही प्रकारे संबंधित असलेल्या नोंदवहया, वहया किंवा निर्देशांक यांची तपासणी किंवा निरीक्षण संगणकीकृत पद्धतीने करण्यात येत असेल अशा प्रत्येक नोंदीसाठी. | २५ |
| (२) खंड (१) अन्वये तपासणी करण्यात आली असेल अशा बाबतीत— | |
| (क) बारा वर्षापर्यन्त तपासणी अहवालासह ... | ३०० |
| (ख) त्यापुढील प्रत्येक जादा वर्षासाठी तपासणी अहवालासह | २५ |
| (३) प्रत्येक वर्षातील प्रत्येक मालमत्तेच्या प्रत्येक दस्तऐवजा-संबंधातील नोंदवही, वहया किंवा निर्देशांक यांची तपासणी किंवा निरीक्षण असंगणकीकृत पद्धतीने करण्यात येत असेल अशा, प्रत्येक नोंदीसाठी. | २५ |

"**स्पष्टीकरण.**––नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणीच्या प्रतीसाठी अर्ज करताना त्यामध्ये, मागणी व निष्पादन करणाऱ्या व्यक्तींची नावे, दस्तऐवजाचे स्वरूप आणि नोंदणीचे वर्ष व ठिकाण दर्शवण्यात आल्यास तपासणीकरिता कोणतीही फी आकारली जाणार नाही."

(ग) टीप ४ ऐवजी पुढील टीप दाखल करण्यात येत आहे, ती अशी :––

"**टीप ४.**––एखाद्या विनिर्दिष्ट मालमत्तेचा बाजारभाव ठरविण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जावरून, केलेल्या तपासणी संबंधात रुपये १०० इतकी एकसमान दरातील तपासणी फी आकारण्यात येत आहे."

(ञ) उक्त तक्त्यामधील अनुच्छेद तेरामध्ये, स्पष्टीकरणानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे, तो असा :––

"**टीप.**––एखाद्या व्यक्तीने, दस्तऐवज प्राथम्य तत्वावर छायाचित्रित करण्याची विनंती केल्यास, त्यासाठी नियमित छायाचित्रण फी व्यतिरिक्त रुपये १०० इतकी जादा फी आकारली जाईल आणि एखाद्या व्यक्तीने, दस्तऐवज सर्व प्राथम्याने छायाचित्रित करण्याची विनंती केल्यास, त्यासाठी नियमित छायाचित्रण फी व्यतिरिक्त रुपये २०० इतकी फी आकारली जाईल. प्राथम्य तत्वावर, छायाचित्रित करावयाच्या दस्तऐवजांच्या बाबतीत, व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांना संबंधित नोंदणी अधिकाऱ्यामार्फत अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत दस्तऐवज अर्जदारास परत करण्यात येईल."

(ट) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद चौदाऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :––

| | |
|---|---|
| "चौदा.––कोणत्याही व्यक्तीच्या फायद्यासाठी किंवा कलम ६५, ६६ आणि ६७ अन्वये कोणत्याही अधिकाऱ्याला पाठवावयाच्या नोंदीच्या व दस्तऐवजाच्या प्रती तयार करण्यासाठी व देण्यासाठी, किंवा कलम ७६ अन्वये निबंधकाने नकार दिल्याबद्दलच्या कारणाच्या प्रती तयार करण्यासाठी व देण्यासाठी. | रुपये ५" |

(ठ) उक्त तक्त्यामधील,––

(क) अनुच्छेद पंधराऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :––

| | |
|---|---|
| "पंधरा.––जादा प्रतीसाठी अर्जदाराने अर्ज केल्यास जतन केलेल्या निगेटिव्हमधून त्या देण्यात येतील. | प्रतिपृष्ठ" रुपये २० |

(ख) टीपेनंतर पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येत आहे :—

"**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदामध्ये, "पृष्ठ" या संज्ञेचा अर्थ कागदाची एक बाजू असा आहे."

(ड) उक्त तक्त्यामधील, अनुच्छेद सोळा ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :—

"सोळा.—नकाशाच्या प्रती देण्यासाठी व्यवस्था करणे आणि अशा प्रती तयार करण्यासाठी खर्च करणे या गोष्टी त्यांसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडून भागविण्यात आल्यास नकाशाच्या प्रती देण्यासाठी. रुपये २०

(ढ) उक्त तक्त्यामधील अनुच्छेद अठराऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :—

"अठरा.—झेरॉक्स पद्धतीने तयार केलेल्या प्रतीसाठी,—

(अ) ३०.५ से.मी. x २१.५ से.मी. आकारापर्यंतच्या प्रत्येक पृष्ठासाठी. रुपये ५

(ब) वरील (एक) मध्ये नमूद केलेल्या आकारापेक्षा मोठया आकाराच्या प्रत्येक पृष्ठासाठी भागशः प्रती काढणे आवश्यक असलेल्या ३०.५ से.मी. x २१.५ से.मी. आकारापर्यंतच्या प्रत्येक भागासाठी. रुपये ५

**टीप १.**—जर संबंधित व्यक्ती प्राथम्यतत्वावर झेरॉक्स प्रतीची मागणी करील तर वरील फी च्या दुप्पट फी आकारण्यात येईल.

**टीप २.**—दस्त नोंदणीच्या वेळी सूची क्र. २ तयार होणार असून त्यावेळी संबंधित पक्षकाराने सूची क्र. २ च्या प्रती करीता अर्ज सादर केला असता नक्कल फीची आकारणी करण्यात येणार नाही. अन्यतः इतर वेळी पक्षकाराने प्रतीची लेखी मागणी केल्यास अनुच्छेद १८ च्या पोटकलम अ व ब अनुसार फी आकारण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदामध्ये, "पृष्ठ" या संज्ञेचा अर्थ कागदाची एक बाजू असा आहे;

(ण) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद एकोणीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे,तो असा :—

"एकोणीस.—जादा किंवा अतिरिक्त फी

कोणत्याही दस्तऐवजाची कलम ३०(१) अन्वये निबंधकाकडून नोंदणी करून घेण्यासाठी सर्वसाधारण फी व्यतिरिक्त. रुपये १००

**टीप.**—एखाद्या निबंधकाला दुय्यम असलेल्या दुय्यम निबंधकाने योग्यरीतीने नोंदणी करण्यायोग्य असलेल्या कोणत्याही दस्तऐवजांच्या नोंदणीचे काम, अशा दस्तऐवजांद्वारे दर्शित केलेल्या व्यवहारास तो दुय्यम निबंधक एक पक्षकार असल्यामुळे किंवा एखादा दस्तऐवज इंग्रजी भाषेत लिहून त्याला सादर केला असेल आणि त्याचा यथार्थ अनुवाद आणि त्याची खरी प्रत सोबत जोडली असेल परंतु दुय्यम निबंधकाला इंग्रजी भाषेचे ज्ञान नाही या कारणासाठी, दुय्यम निबंधकाने पार पाडले असेल तर अशा बाबतीत जादा फी आकारण्यात येणार नाही.".

(प) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद वीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :—

वीस.—कलम ३३ किंवा ३८ अन्वये आयोगपत्र काढण्यासाठी,—

| | |
|---|---|
| (क) जर एखादी व्यक्ती कार्यालयात उपस्थित राहण्यास शारीरिकदृष्टया असमर्थ असेल किंवा तुरुंगामध्ये बंदिस्त असेल तर | रुपये ५० |
| (ख) वरील (क) व्यतिरिक्त अन्य कारणासाठी | रुपये १०० |

(थ) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद एकवीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| "एकवीस.—कलम ६२ अन्वये अनुवाद दाखल करण्यात येत आहे. | रुपये २०" |

(द) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद बावीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :—

"बावीस.—खाजगी निवासस्थानातील किंवा तुरुंगातील उपस्थिती,—

(१) कलमे ३२, ३३ व ३८ खालील खाजगी निवासस्थानातील प्रत्येक उपस्थितीसाठी,—

| | |
|---|---|
| (क) महानगरपालिकेच्या सीमांच्या आत | रुपये ३०० |
| (ख) नगरपालिका असलेल्या शहरातील व नगरातील क्षेत्रे व देवळाली, देहू रोड, औरंगाबाद, खडकी ही कॅन्टोन्मेट क्षेत्रे (कटक मंडळे) आणि इतर सर्व ठिकाणे. | रुपये २०० |
| (२) कलमे ३१, ३३ व ३८ खालील तुरुंगाकडील प्रत्येक उपस्थितीसाठी,— | रुपये १०० |

**टीप १.**——पडदानसीन किंवा उच्चकुलीन अशा एका किंवा अधिक महिला निष्पादकाच्या अंगठ्याचा ठसा घेण्यासाठी नोंदणी अधिकाऱ्याबरोबर एखाद्या परिचारिकेने किंवा महिला सहायकाने जाणे आवश्यक असेल तर खाजगी निवासस्थानातील अशा प्रत्येक उपस्थितीसाठी, अशा खाजगी उपस्थितीदरम्यान नोंदणी केलेल्या दस्तऐवजांची संख्या कितीही असली तरी, या अनुच्छेदाच्या खंड (१) व (२) मध्ये विहित करण्यात आलेल्या दराने जादा फी आकारण्यात येत आहे."

(ब) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद तेवीस मधील पहिल्या परंतुकामध्ये, "रुपये १५.००" या मजकुराऐवजी "रुपये २५.००" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

(न) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद चोवीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :——

"चोवीस.——कलमे ६४, ६५ व ६६ अनुसार पाठवावयाच्या ज्ञापनाच्या प्रत्येक प्रतीसाठी रुपये ५."

**टीप.**——मूळ प्रतीसह नोंदणीसाठी सादर केलेल्या दस्तऐवजाच्या प्रतीच्या किंवा प्रतींच्या बाबतीत मूळ प्रतीनंतर किंवा प्रती सादर केल्यास मूळ प्रतीच्या नोंदणीचा संदर्भ उद्धृत केलेला असेल अशाबाबतीत फी देय असणार नाही."

(प) उक्त तक्त्यामध्ये, अनुच्छेद पंचवीस ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येत आहे :——

"पंचवीस.——मुखत्यारनाम्याचे अधिप्रमाणन किंवा साक्षांकन करण्यासाठी.——　　रुपये २५.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. के. केळबाईकर,**
कार्यासन अधिकारी.

11